# सन २०२४-२५ जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये ओपन सायन्स पार्क विकसित करणे बाबत.

अहिल्यानगर जिल्हयातील जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी जिल्हा परिषदे मार्फत अनेक उपक्रम राबविले जातात. जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन वाढीस लागावा ,विज्ञान विषयक संकल्पना दृढ व्हाव्यात, प्रत्यक्ष अनुभवाद्वारे कृतियुक्त शिक्षण मिळावे , कुतूहल व शोधनवृत्ती निर्माण व्हावी. यासाठी . मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर श्री. आशिष येरेकर यांचे मार्गदर्शनाखाली अहिल्यानगर जिल्हा परिषद च्या सेस निधीतून (जि.प. सांकेतांक ३९२२, शासकीय सांकेतांक २२०२-८००-५० अंतर्गत) ओपन सायन्स पार्क विकसित करणे कामी ५० लक्ष इतक्या (प्रति शाळा १० लक्ष या प्रमाणे ५ शाळेस ५० लक्ष) किमतीची तरतूद करणेत आली होती.

पात्रतेचे निकष खालील प्रमाणे.

१. शाळेकडे ५ गुंठे जागा उपलब्ध असने अनिवार्य आहे .
२. ग्रामपंचायत त्यांचे निधीतून/ लोकसहभागातून रक्कम रुपये १० लक्ष निधीची तरतूद करण्यास तयार पाहिजेत.
३. आवश्यक सिव्हिल वर्क ग्रामपंचायत / शाळा व्यवस्थापन समिती मार्फत केले गेले पाहिजे.
४.

त्यानुषंगाने, **अहिल्यानगर जिल्ह्यातील ५ जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ओपन सायन्स पार्क साठी निवडण्यात आल्या. यामध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा संवत्सर ता. कोपरगाव, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सारोळा कासार ता. अहिल्यानगर, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पानोली ता. पारनेर , जिल्हा परिषद प्राथमिक शाळा काष्टी ता. श्रीगोंदा व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोळगाव ता. श्रीगोंदा या शाळेचा समावेश करण्यात आला होता.**

ओपन सायन्स पार्क मध्ये एकूण २२ विज्ञान विषयक उपकरणे व माहिती फलक स्थापित करण्यात आले आहेत. ओपन सायन्स पार्क विकसित केल्यामुळे,आनंददायी शिक्षणातून विज्ञान संकल्पना विद्यार्थ्यांमध्ये रुजत आहेत, विद्यार्थ्यांना विज्ञान विषयाची आवड निर्माण होऊन शाळेची गोडी वाढत आहे यामुळे विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढण्यासाठी मदत होत आहे.

# जिल्हा परिषद अहिल्यानगर सेस निधीतून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा संवत्सर तालुका कोपरगाव जिल्हा अहिल्यानगर येथील ओपन सायन्स पार्क









# जिल्हा परिषद अहिल्यानगर

# शिक्षण विभाग (प्राथमिक)

# मिशन आपुलकी

# यशोगाथा

# उपक्रम उद्देशिका

मिशन आपुलकी उपक्रमाबाबत -

अहिल्यानगर जिल्हयात जिल्हा परिषदेच्या 3536 शाळा असून शासन व जिल्हा परिषद स्तरावरून या शाळांना भौतिक सुविधा पुरविण्याचे काम सातत्याने सुरू आहे. तरी जिल्हा परिषद शाळांमधून शिक्षण घेवून अनेक विद्यार्थी समाजकारण, राजकारण, प्रशासन, व्यापार, शेती तसेच औदयोगिक क्षेत्रात नेत्रदिपक प्रगती करत आहेत. या विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रात मिळविलेल्या यशामुळे जिल्हा परिषद शाळांच्या नावलौकीकात भर पडली आहे. या माजी विद्यार्थ्यांची नाळ या जिल्हा परिषद शाळांशी जोडलेली आहे.

त्यानुषंगाने शाळेचे माजी विद्यार्थी, गावातील प्रतिष्ठीत, दानशूर नागरिक, सेवाभावी संस्था, परिसरात असणा-या औद्यागिक कंपन्या इ. आवाहन करण्यात आले आहे.

तरी सदर उपक्रमाला याद्वारे चांगला प्रतिसाद मिळत असून लोक सहभागातून वस्तूरूपाने शाळास्तरावर माहे डिसेंबर, 2024 अखेर रक्कम रू.53,10,10,075/- (अक्षरी रू. त्र्येपन कोटी दहा लक्ष दहा हजार पंचाहत्तर मात्र) लोकसहभाग प्राप्त झाला आहे.

# मिशन आपुलकी अंतर्गत प्राप्त तालुकानिहाय (वस्तूस्वरूपात) लोकसहभाग

| अ.क्र. | तालुका | दि. 1 मे 2022 ते डिसेंबर.2024 अखेर प्राप्त लोकसहभाग (वस्तुस्वरूपात) |
|---|---|---|
| 1 | अहमदनगर | 202622105 |
| 2 | पारनेर | 45662797 |
| 3 | राहाता | 18799822 |
| 4 | नेवासा | 16110323 |
| 5 | शेवगाव | 6219907 |
| 6 | पाथर्डी | 9851068 |
| 7 | संगमनेर | 26375335 |
| 8 | अकोले | 23625755 |
| 9 | जामखेड | 5738830 |
| 10 | कोपरगाव | 6350292 |
| 11 | कर्जत | 62229463 |
| 12 | श्रीरामपूर | 5512954 |
| 13 | श्रीगोंदा | 21799028 |
| 14 | राहुरी | 27962396 |
| 15 | लीडरशीप फार स्किल्ड एज्युकेशन फाऊंडेशन (LFSEF) पुणे व क्रॉम्पटन ग्रीव्हईज मार्फत लोकसहभाग | 5500000 |
| 16 | राष्ट्रीय बौध्दिक दिव्यांगजन सशक्तीकरण संस्थान ,मुंबई | 1530000 |
| 17 | ग्रंथालयाकरीता (रोटरी क्लब मार्फत 70 शाळांना पहिल्या टप्प्यात कपाट व पुस्तके) | 420000 |
| 18 | शाळांना सन फार्मा कंपनी लि.कडून 1000 शिष्यवृत्ती संचिका प्रदान करण्यात आले. | 700000 |
| 19 | CG Power कंपनी यांचेकडून बेंचेस वॉटर कुलर, टेबल, खुर्चा, संगणक, प्रिंटर व इंटरॲक्टिव बोर्ड प्राप्त. | 12500000 |
| 20 | इन्फोसिस स्प्रिंगबोर्ड फाऊंडेशन, बंगलोर यांचे CSR निधीतून 70 जि.प.शाळांना 14000 टॅब व 50 शाळांना 100 स्मार्ट टि.व्ही. प्राप्त | 31500000 |
| **एकूण** | | **531010075** |

जि.प.प्राथ.शाळा अंबिकानगर अंबा प्रतिष्ठाण यांचे तर्फे शाळेला 50 गुंठे जागा व प्रशस्त इमारत बांधकाम अंदाजीत रक्कम रू.1.50 कोटी



# जि. प. प्राथ. शाळा पानोली ता.पारनेर
# लोकसहभागातून साकारलेली देशातील सर्वात अत्याधुनिक डिजिटल लॅब

- **Futuristic Classroom.** कमिन्स इंडिया, नाबार्ड तसेच ऐक्य सेवा सेंटर यांच्या मदतीने शाळा बांधकाम व इतर सोयी सुविधा - रू. **82.50** लक्ष
- स्थानिक लोकसहभाग – रू. **51.88** लक्ष



# जि.प.प्राथ.शाळा कौठे खु.ता.संगमनेर

मातृभूमी फाऊंडेशन कौठे खुर्द.ता.संगमनेर यांचेमार्फत रू.1.00 कोटी खर्चातून संपूर्ण शाळा बांधकाम व फर्निचर चे काम




# जि.प.प्राथ.शाळा घोडेगाव ता.श्रीगोंदा

Lavender Lab. Pvt. Ltd कुरकुंभ ता.दौंड यांचेकडून एक संगणक खोली, आकर्षक प्रवेशद्वार, अथर्व ग्रुप ऑफ इंडस्ट्रिज कडून शालेय आवारात क्रॉक्रीटीकरण, सुदाम वाघमारे यांचेकडून वाचानालय व लोकसहभागातून ध्वजस्तंभ



# जि.प.प्राथ.शाळा वांबोरी (मुली).ता.राहुरी



# KSB कंपनी यांचे CSR निधीतून रू.2.25 कोटीची इमारत पूर्ण



# जि.प.प्राथ.शाळा निमगाव वाघा.ता.अहिल्यानगर

PRM Software Solution.Pune यांच्या CSR निधीतून अंदाजे रू. 3.50 कोटी रक्कमेचे संपूर्ण इमारत बांधकाम प्रस्तावित 3D चित्र



# जि.प.प्राथ.शाळा निमगाव वाघा.ता.अहिल्यानगर

PRM Software Solution.Pune यांच्या CSR निधीतून अंदाजे रू. 3.50 कोटी रक्कमेचे संपूर्ण इमारत बांधकाम प्रस्तावित 3D चित्र

1.10 क्लासरूम, किचन कम

2.डायनिंग हॉल-01

3.कॉम्प्युटर लॅब / डिजिटल क्लास रूम-01

4.ऑफिस -01

5.लायब्ररी/रिडींग हॉल्-01

6.स्टाफरूम-01

7.मिटींग हॉल-01

8.ऑडिटोरियम - 260 चेअर क्षमता असलेले

9.टॉयलेट - Seperate for Boys and Girls

10.वॉल कंपाऊंड

11.बागकाम. इ.

# मनजित कॉटन प्रा . लि . कंपनी कडून पारनेर व श्रीरामपूर तालुक्यातील 4 शाळांना इन्व्हर्टर व बॅटरी प्राप्त.



LFE व CEL  या एन.जी.ओ. मार्फत 16  जिल्हा परिषद शाळांमध्ये संगणक प्रयोगशाळा उभारणी  (प्रत्येक प्रयोगशाळेत 8  संगणक संच)   संगणक कोडींग प्रशिक्षण व  प्रशिक्षणात सर्वोत्तम कामगिरी करणा–या शाळांना डिजीटल शैक्षणिक साहित्य प्रदान.



**ग्रंथालय (रोटरी क्लब मार्फत 70 शाळांना पहिल्या टप्प्यात कपाट व पुस्तके उपलब्ध.**

**टप्पा 2 मध्ये 88 शाळा प्रस्तावित. या उपक्रमामुळे मिशन आपुलकी अभियानाला 4,20,000/- हातभार लागला.**






# जि.प.प्राथ.शाळा तिळवणी ता. कोपरगाव
# बेचेंस प्रदान



# सन फार्मा कंपनी यांचे CSR निधीतून इन्ट्रॅक्टीव पॅनल जि.प.प्राथ.शाळा निंबळक ता. अहिल्यानगर या शाळेला प्राप्त



# जि.प.प्राथ.शाळा नेवासा मुले ता. नेवासा शाळेस रंगकाम



# इन्फोसिस स्प्रिंगबोर्ड ,  बंगलोर यांचे CSR निधीतून प्राप्त टॅब चा वापर करताना जि.प.प्राथ.शाळा, खंडाळा ता.जि.अहिल्यानगर चे विद्यार्थी



# इन्फोसिस स्प्रिंगबोर्ड ,  बंगलोर यांचे CSR निधीतून प्राप्त टॅब चा वापर करताना जि.प.प्राथ.शाळा, उस्थळ दुमाला ता.नेवासा जि.अहिल्यानगर चे विद्यार्थी



इन्फोसिस स्प्रिंगबोर्ड, बंगलोर यांचे CSR निधीतून प्राप्त स्मार्ट टि.व्ही च्या सहाय्याने अध्ययन करताना जि.प.प्राथ.शाळा, रत्नापूर ता.जामखेड जि.अहिल्यानगर चे विद्यार्थी



# जि.प.प्राथ.शाळा चिचोंडी पाटील.
# ता. अहिल्यानगर

CG Power कंपनी, अहिल्यानगर मार्फत वॉटर कुलरचे थंड पाणी पीताना विद्यार्थी



# जि.प.प्राथ.शाळा रायकरवस्ती (हंगेवाडी).ता. श्रीगोंदा

## अल्फा लाव्हल प्रा.लिमिटेड कंपनी दापोडी, पुणे यांचेमार्फत भोजन कक्ष व वाचनालय



# वृत्तपत्र बातमी

## अहिल्यानगरमध्ये शालेय मदतीसाठी 'मिशन आपुलकी'

### दीड हजारांवर शाळांसाठी ५४ कोटींच्या निधीची उभारणी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर जिल्हा परिषदेने 'मिशन आपुलकी' अंतर्गत लोकसहभागातून राबवलेल्या मोहिमेत दोन वर्षांत तब्बल ५४ कोटी ५० लाख रुपयांचे साहित्य उपलब्ध झाले. यामध्ये शाळेत आहार शिजवणाऱ्या महिलेच्या मदतीपासून थेट 'इन्फोसिस' कंपनीच्या निधीतून शालेय साहित्यापासून ते टॅब, शुद्ध पाण्याच्या योजना, शाळांच्या इमारती उभ्या राहिल्या आहेत. या मोहिमेचा तब्बल दीड हजारहून अधिक शाळांना लाभ झाला आहे.

अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या ३,५६० प्राथमिक शाळा आहेत. २०२२ मध्ये तत्कालीन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी आधिकारी राजेंद्र क्षीरसागर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी आधिकारी संभाजी लांगोरे व प्राथमिक शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांनी लोकसहभागातून शाळांच्या विकासाची संकल्पना सुरू केली. मोहिमेला सध्याचे मुख्य कार्यकारी आधिकारी आशिष येरेकर यांनी गती दिली. या मोहिमेला 'मिशन आपुलकी' नाव देऊन त्याची जबाबदारी लेखाधिकारी रमेश कासार यांच्यावर सोपवण्यात आली. त्यासाठी जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांतून शिक्षण घेऊन पुढे उद्योजक, वरिष्ठ अधिकारी झालेल्यांशी पत्रव्यवहार, औद्योगिक क्षेत्रातील कंपन्यांना संपर्क करून त्यांच्या 'सीएसआर' निधीची मागणी करण्यात आली.



जिल्हा परिषदेच्या "मिशन आपुलकी" उपक्रमामुळे शेतकरी, शेतमजुरांची मुले टॅब हाताळू लागली आहेत.

आपल्या गावची शाळा म्हणून लोकसहभागही मिळू लागला. दोन-अडीच वर्षांतच या मोहिमेने ५० कोटी रुपयांचा टप्पा ओलांडला. मोहिमेने प्रेरित होऊन राघो हिवरे (ता. पाथर्डी) या शाळेत आहार शिजवण्याचे काम करणाऱ्या संगीता कासार या महिलेने आपली शाळा म्हणून २० हजार रुपये किमतीची ध्वनिक्षेपक यंत्रणा भेट दिली.